
अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ
महिला आघाडी
ब्रह्मोद्योग
ब्रह्मकेसरी
सांस्कृतिक पत्रिका
जुन २०१७



CHAITANYA NURSERY
Landscaping | Plant, Lawn, Water Fountains on Rent | Garden Development |
Wall Garden | Irrigation Consultancy & Installation | All Types of Plants
All over Maharashtra & Goa Service
Water Fountains on Rent
Plants & Lawn on Rent
Horticultural Consult.
Garden Development
Email:
chaitanyanursery@gmail.com
Website:
www.chaitanyanursery.com
Contact
Abhijit Joshi
9823147757
Landscaping
All Types of Plants

ब्रह्मकेसरी
सांस्कृतिक पत्रिका

जुन २०१७

**मुख्य संपादक**
पं. वसंतराव गाडगीळ

**संपादक**
गोविंद कुलकर्णी

**सहसंपादक**
अनिरुद्ध जोशी

**मुख्यपृष्ठ आणि मांडणी**
अनिरुद्ध जोशी

# अंतरंग

| | |
|---|---|
| मोहिनीताई पत्की यांचा विदर्भ दौरा | ०४ |
| महासंघाचे दत्तकगाव पुंगाव येथे विकासकामे | ०७ |
| पुंगावचा आराखडा तयार | ०९ |
| वट पौर्णीमा | १० |
| ब्राह्मण समाजाची वेब डिरेक्टरी | १२ |
| अनिल कुलकर्णी यांच्यावरील अन्यायाला वाचा | १४ |
| उपनयन संस्कार : बीड | १६ |
| सावरकर जयंती उत्साहात साजरी | १७ |
| महासंघाचे यश : महापालिका सभागृहात सावरकरचे तैलचित्र | २० |
| ब्रह्मोद्योग | २१ |
| दिनविषेश | २३ |

पत्रव्यवहाराचा पत्ता
ब्रह्मजागृती प्रकाशन
स्नेह-स्मृती, गणेश नगर,
भोसरी, पुणे ४११०३९
मोबाईल- ९६२३४३०१६६
email: abbmgkulkarni@gmail.com

हे मासिक संपादक/प्रकाशक/मालक
गोविंद कुलकर्णी यांनी भोसरी येथे
ब्रह्मजागृती प्रकाशनासाठी प्रकाशित केले.
(पुणे न्यायालयीन कक्षेत)

अंकाच्या लेखाच्या मतांशी
संपादक सहमत असतीलच असे नाही.

RNI NO.
MAHAR/36671/13/2010
Decl. No. SDM/HAVELI/SR/01/2010

## प्रदेश महिला अध्यक्ष मोहिनीताई पत्की यांचा पश्चिम विदर्भ दौरा यशस्वी

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचा महिला आघाडीच्या अध्यक्ष मोहीनी पत्की यांचा विदर्भ दौरा 21-22 मे रोजी आयोजित करण्यात आला होता त्यात चिखली सकाळी 10.30, दुपारी 2.30, बुलढाणा तर दुपारी 4.00 ला खामगाव, 5.30 शेगाव, 7.30 अकोला तर दि 22 रोजी सकाळपासून 9.30 मूर्तीजापूर 11.00 वाजता अमरावती, दुपारी 4.00ला वाशिम करुन सोलापूर असा दौरा पुर्ण झाला अगदी उन्हाळ्यात असलेल्या या बैठकीत महिलांची संख्या चांगली होती.

संघटनेचे काम महाराष्ट्रातील 300 तालुका स्तरावर पुर्ण करण्याचा हा हेतु असुन महाराष्ट्रस्तरावर सक्षम महिला आघाडी उभी करुन एक अधिवेशन सोलापूर येथे व्हावे असा संकल्प अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष मा. श्री गोविंदराव कुलकर्णी यांचा आहे त्या हेतुने मा. अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश श्री उदयजी महा यांनी हा प्रवास आखला होता यामध्ये संघटना, तालुकास्तरावर कार्यकारिणी, महीलाउद्योग



बचत गट व इतर समस्या अशी चर्चा व काही निर्णय झाले.

या सर्व दौऱ्यात सर्व तालुक्यातील महिला अति उत्साहाने उपस्तीत राहिल्या चिखली, बुलढाणा, खामगाव, शेगांव, अकोला येथील महिलांनी चांगला प्रतिसाद दिला.

## ब्राह्मण महिलांनी स्वतःसह कुटूंब व समाजाचा विकास साधावा - मोहिनीताई पत्की

चिखली - पारंपारिक संस्कार आणि आधुनिक जीवनपध्दती यांची योग्य सांगड घालून ब्राह्मण महिलांनी उद्योग व्यवसायातही पुढे यावे आणि आपल्या कुटूंबासह समाजाचा विकास साधावा असे आवाहन अ. भा. ब्राह्मण महासंघाच्या महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष मोहिनीताई पत्की यांनी केले.

21 मे रोजी आयोजित ब्राह्मण महिला मेळाव्यास मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. या प्रसंगी मंचावर महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष रामचंद्र तडवळकर, युवा आघाडी प्रदेश सरचिटणीस रेणुकादास मुळे, जिल्हा कार्याध्यक्ष जी. टी. कुळकर्णी व सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ कुळकर्णी हे उपस्थित होते.




सध्याच्या सामाजिक परिस्थितीमध्ये घर आणि समाजात महिलांची भूमिका फार महत्वाची असून त्यांच्या खांद्यावर जबाबदारी देखील मोठी आहे. ही भूमिका समर्थपणे निभावण्यासाठी महिला सक्षमीकरण व महिला संघटन आवश्यक आहे, त्याकरीता शाखा, भाषा व प्रांतभेद विसरुन ब्राह्मण महिलांनी एकत्र यावे असे मोहिनीताई पत्की म्हणाल्या. ब्राह्मण महासंघाकडून महिलांना सर्वतोपरी सहकार्य व मार्गदर्शन केले जाईल असे आश्वासन पत्की यांनी दिले.

या वेळी ब्राह्मण युवती आघाडीची घोषणा त्यांनी केली तसेच महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस नीता कुळकर्णी यांची बी. बी. एम. गृपच्या जिल्हा प्रमुख म्हणून नियुक्ती श्रीमती पत्की यांनी केली.

# ब्राह्मण महिलांनी स्वत:सह कुटूंब व समाजाचा विकास साधावा – मोहिनीताई पत्की




आपल्या प्रास्तविकातून नीता कुळकर्णी यांनी महिला मेळाव्याच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. जी. टी. कुळकर्णी यांचे देखील समयोचित भाषण झाले. मेळाव्याचे सूत्रसंचालन कविता लंके यांनी केले, अनिता कुळकर्णी यांनी स्वागत गीत सादर केले तर राजश्री देशपांडे यांनी आभार मानले. गंगाबाई महाजन मंगल कार्यालयात झालेल्या या मेळाव्याच्या आयोजनासाठी कविता मुळे, गायत्री जोशी, मुक्ता भालेराव, अश्विनी भालेराव, गौरी कुळकर्णी आदींनी पुढाकार घेतला.



नंतर मूर्तिजापूर अमरावती वाशिम या ठिकाणी जाऊन मोहिनीताई यांनी आपले विचार मांडले वाशिमला चांगला प्रतिसाद मिळाला. या मध्ये सौ स्मितताई जोशी यांना वाशिम महिला अध्यक्ष घोषित करण्यात आले मोहिनीताई यांनी याची घोषणा केली. सोलापूरचे राम तळवलकर हे मोहिनीताई सोबत होते

वाशिम येथील कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शशिकांत दंडवते प्रदीप टाकळकर वांगे सर आदीनि परिश्रम घेतले सौ गार्गी जोशी यांनी संचालन केले

या प्रवासात महीला आघाडी सरचिटनिस सौ निता कुलकर्णी चिखली, डॉ सुजाता मुलमुले मूर्तीजापूर, जी टी कुलकर्णी बुलढाणा, पत्रकार कुलकर्णी शेगाव, संघटन प्रमुख अभयजी खेडकर, श्री व सौ सोनटक्के अकोला, श्री दंडवते वाशिम यांनी खुपच परिश्रम घेतले सौ पाठक यांनी (बुलढाणा अध्यक्ष) कुमारीकांची उपस्थिती लक्षणीय ठेवली होती अशा सर्वाच्या सहकार्याने हा दौरा यशस्वी झाला. लवकरच मराठवाडयातील विभाग दौरा ठरवण्याचा मानस असल्याचे प्रा. मोहीनी पत्की यांनी सांगीतले



प्रदेश उपाध्यक्ष राम तडवळकर यांचा सत्कार करताना

# Malhar Computers

## Dextop, Laptop, CCTV Sales & Services

Computer Repairs
Data Recovery
Virus Removal
Security, Camera
Network Setup
Printer Sales
Hardware Upgrade
Software Upgrade

Pune
Aniruddha Joshi
7385856313

Kolhapur
Tushar Joshi
9370016151

# महासंघाने दत्तक घेतलेल्या गावात, पुंगाव येथे स्ट्रीट लाईटचे उद्घाटन

आदर्श गाव योजना ही आमदार खासदारांची आहे. पण अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने पुंगाव (जि. कोल्हापुर, ता. राधनगरी) हे गाव दत्तक घेउन त्याचा विकास करण्याचा संकल्प केला आहे हे कौस्तुकास्पद आहे. येथील ग्रामस्थांचे सहकार्य लाभलेतर या गावाचा विकास व्हायला वेळ लागणार नाही. त्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्नशील राहीन असे आवाहन खासदार अमर साबळे यांनी केले. ते पुंगाव येथे महासंघाच्या वतीने दिलेल्या स्ट्रीट लाईटच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. अध्यक्ष स्थानी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गोविंदजी



कुलकर्णी होते. उद्योजक श्रीकांत बडवे, आमदार प्रकाश आबीटकर हे प्रमुख पाहुणे होते.

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने हे गाव विकास कामासाठी दत्तक घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणुन गावासाठी साडेतीन लाख रुपयांचे एल. ई. डी. बल्ब गावातील खांबावर लावण्यात आले आहेत. यावेळी बोलताना साबळे म्हणाले, लोकांचा विकास हाच माझा विकास. गावातील लोकसहभागाचे पाठबळ राहिल्यास विकासात्मक काम करायला महासंघ आणि आम्ही लोकप्रतिनिधी प्रयत्नशील राहु. मान्यवरांच्या हस्ते परशुराम प्रतिमापुजन आणि दिपप्रज्वलन झाले. राष्ट्रीय महासचीव श्यामराव जोशी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रदेश कार्याध्यक्ष विश्वजीत देशपांडे यांनी प्रास्ताविक तर श्रुती कुलकर्णी यांनी स्वागतगीत सादर केले.

यावेळी आदर्श शिक्षक गणेश शंकर पाटील यांना उद्योजक श्रीकांत बडवे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. तर जि. प. चे नुतन सदस्य पांडुरंग भांदिगरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार प्रकाश आबीटकर म्हणाले, महासंघाच्यावतीने आणि आमच्या सहभागातुन पुंगावच्या विकासात्मक कामासाठी चालना देऊ. सत्कार मुर्ती गणेश पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.

गोविंदजी कुलकर्णी हे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले. या गावासाठी संस्कार, उद्योग, शेती यासाठी विविध योजनांचा अभ्यास करुन त्याचा आराखाडा करण्याचे काम सुरु आहे. लोकप्रतिनीधी आणि उद्योजक यांच्या सहकार्यातुन गावाचे मॉडेल करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

मान्यवरांच्या हस्ते स्ट्रीट लाईटचे उद्घाटन झाले. खा. साबळे यांना सरपंच मंगल पाटील उपसरपंच बी. जी. पाटील, सर्व सदस्य, ग्रामसेवक श्रीराम कांबळे यांनी



अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्यावतीने दत्तकगाव पुंगावचा विकास आराखडा खासदार अमर साबळे यांना सादर करताना सरपंच मंगल पाटील, उपसरपंच बी. जी. पाटील व सदस्य, महासंघाचे शामराव जोशी आणि

## महासंघाने दत्तक घेतलेल्या गावात, पुंगाव येथे स्ट्रीट लाईटचे उद्घाटन

यांनी विकास आराखडा सादर केला. समारंभाला प्रकल्प प्रमुख वसंत मुतालीक, जिल्हाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, महिलाध्यक्षा रेणु जोशी, नंदकुमार वेठे, अनंत जोशी, लक्ष्मण कुलकर्णी, अनिता कुलकर्णी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे शेवटी प्रसाद कुलकर्णी यांनी आभार मानले.



आदित्य मैंदरीकर यांनी सुत्रसंचालन केले.



स्ट्रीट लाईटचे कळ दाबुन उद्घाटन करताना
खासदार अमर साबळे, आमदार प्रकाश आबीटकर, उद्योजक श्रीकांत बडवे आदी

### लेखकांसाठी

**आपले लेख अथवा कविता खालील पत्त्यावर पाठवाव्यात**

ब्रह्मजागृती प्रकाशन
स्नेह–स्मृती, गणेशनगर
भोसरी, पुणे– 411039
Ph: 9623430166
email: anisjoshi@gmail.com

**ब्रह्माकेसरीमध्ये जाहिरात म्हणजे कमी खर्चात जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा राजमार्ग**

**जाहिरातीसाठी संपर्क**
**अनिरुद्ध : 7385856313**



# पुंगावचे रुपडे पालटणार

**पुंगावची लोकसंख्या तीन हजाराच्या आसपास आहे. गावावर निसर्ग सौंदर्याची उधळण आहे. गावात पुरातन मंदीरे आहेत. पर्यटन विकासाला प्रचंड वाव आहे. पर्यटन विकास झाला तर त्याचा प्रभाव गावच्या अर्थकारणावर होइल. रोजगाराच्या संधी निर्माण होतील, अर्थार्जन वाढेल यासाठी गावच्या पर्यटन विकासासाठी कृतीबद्ध कार्यक्रम राबविले जाणार आहेत.**

**- शामराव जोशी, राष्ट्रीय महासचिव, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ**

राधानगरी तालुक्यातील पुंगाव हे गाव सर्वार्थाने आदर्श बनविण्याचा आराखडा अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने आखला आहे. गावाचा पर्यटन विकास, त्यामाध्यमातुन रोजगाराच्या संधी, आर्थीक स्वावलंबन आणि संस्कारक्षम मुल्यांची रुजवात ही ग्राम विकासाची त्रीसुत्रे ठरविलेली आहे.

गावातील महिलांना आर्थीक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी बचत गटाची व्याप्ती वाढविणात येणार आहे. अधिकाधीक महिलांना त्यामधे समावुन घेतले जाणार आहे.

आदर्श ग्राम संसद च्या धर्तीवर अखिल भारतीय ब्राह्मण महासंघामार्फत राज्यातील २५ गावे आदर्श ग्रामसाठी दत्तक घेतली जाणार आहे. त्याची सुरुवात पुंगाव पासुन करण्यात येत आहे. लोकसहभाग, विविध संघटना, तरुण मंडाळाच्या सहकार्याच्या माध्यमातुन गावाचा विकास साधला जाणार आहे.

गावातील मुलांमधे व्यापार, उद्योगाची कौशल्ये विकसित व्हावीत याकरीता व्यापार उद्योग संदर्भात कार्यशाळा घेतल्या जाणार आहेत. मोठे कारखानदार, या क्षेत्रातील तज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी प्राप्त होणार आहे.

राज्यसभेतील खासदार अमर साबळे यांनी खासदार फंडातुन निधी उपलब्ध करुन देण्याची ग्वाही दिली आहे. आमदार प्रकाश आबिटकर यांनी सहकार्याची ग्वाही दिली आहे.

ब्राह्मण महासंघाच्या पुढाकाराने गावात साठ एलईडी लाईट बसविण्याच्या उपक्रमाला सुरुवात झाली. महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गोविंदजी कुलकर्णी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. महासंघाने ग्राम विकासाचा आराखडा तयार केला आहे.

यापुर्वी गावात आरोग्य तपासणी शिबिर झाले आहे. पशुधन तपासणी करण्यात आली. नागरीकांना आधारकार्ड उपलब्धतेसाठी शिबिर भरविले होते. गावामधे संस्कार वर्ग चालविले जाणार आहेत. गावामधे ग्रंथालय उभारणी प्रस्तावित आहे. याकरीता एक हजार पुस्तके ग्रामपंचायतीकडे सुपुर्द केली आहेत.

महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष विश्वजीत देशपांडे, प्रकल्प प्रमुख वसंत मुतालीक, जिल्हाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, उपाध्यक्ष राजेन्द्र अभ्यंकर, महिला जिल्हाध्यक्षा ज्योती जोशी यांच्यासह संघटनेतील पदाधीकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

## वट पौर्णीमा

■ ॲड. वृषाली दातार



**जेष्ठ पौर्णीमा** हा दिवस आपण मोठ्या उत्साहाने वट पौर्णीमा म्हणुन साजरा करतो. ह्या दिवशी सुवासिनी वट सावित्रीचे व्रत करतात. व आपल्या पतीच्या दिर्घ व निरोगी आयुष्यासाठी प्राथना करतात. तसेच वडाच्या झाडाची पुजा देखील करतात.

आपल्या सगळ्याच सणांमधुन अनेक प्रकारची शिकवण आपणास मिळते. समाजाचा व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आपले सण आपल्याला प्रेरीत करतात. परंतु आजच्या काळात आपण आपल्या सणांचे महत्व समजावुन घेउन, त्याप्रमाणे आचरण करावयास हवे. आत्ता आपण वट पौर्णीमेचेच उदाहरण पाहूया.

जेष्ठ पौर्णीमेच्या दिवशी सावित्रिने आपल्या पतीचे म्हणजेच सत्यवानाचे प्राण प्रत्यक्ष यम देवाकडुन परत आणले अशया प्रकारची कथा आपण ऐकतो. त्याचा सखोल विचार केला तर सावित्री ही आपल्याला एक स्त्री शक्तीचे प्रतिकच दिसेल. एक स्त्री तिने जर ठरविले तर ती काहीही करु शकते. अगदी अशक्य वाटणारी गोष्ट सुद्धा ती सहज आपल्या घरासाठी आणि समाजासाठी करु शकते.

**सावित्रीने आपल्या पतीचे प्राण हे यम देवांशी प्रश्न उत्तरांमधे जिंकुन युक्तीने परत आणले. म्हणजेच सावित्री ही एक शिक्षीत आणि वेद विद्याभ्यास पारंगत स्त्री असावी. ईथे आपल्याला स्त्री शिक्षणाचे महत्व दाखविले आहे. एक शिक्षीत स्त्री नेहमीच तिच्या कुटुंबास व समाजास उंचीवर नेते ह्यात शंकाच नाही. आपण आजच्या काळात बघीतले तरी आपल्याला आपल्यातच अनेक सावित्री दिसतील. पतीचा जीव वाचविण्यासाठी स्वत:च्या यकृताचा भाग, किडणी देणाऱ्या तसेच पतीच्या बरोबरीने संसाराला हातभार लावणाऱ्या, एका वेळी अनेक जबाबदाऱ्या सक्षम पणे पेलणाऱ्या ह्या सर्व महीला सावित्रीचीच रुपे नाहीत काय ?**

## वट पौर्णीमा

■ ॲड. वृषाली दातार



एकीकडे हा अलौकीक त्याग बघायला मिळतो तर दुसरीकडे शुल्लक कारणासाठी भांडणे करुन विभक्त होणारी जोडपी आपण पहातो. ह्याने समाजाचा समतोल ढासळतो आहे. म्हणुन प्रत्येक स्त्रीने आणि पुरुषाने देखील या वट पौर्णीमे निमित्ताने आत्मपरीक्षण करावयास हवे. समाजाचा हा समतोल आपली संस्कृती आपण कशी जपू शकू, त्याचे कसे जतन करू शकू ह्याचा विचार आपण सर्वांनी करावयास हवा.

ह्या सणामध्ये वडाच्या झाडाची पुजा सांगीतली आहे. वडाच्या झाडामधे शिवतत्व पृथ्वीवर खेचण्याची ताकत आहे आणि प्रत्येक महिला ही शक्तीचे रुप आहे. शक्तीच्या जाणीवेने शिवाच्या धारणेशी एकरुप होण्यासाठी ही पुजा केली जात असावी.

म्हणजेच इथे आपला अहंकार सोडुन स्वाभिमानाने जगण्याची कला सांगीतली आहे. वडाच्या वृक्षाचा पर्यावरणाशी देखील संबंध आहेच. हे झाड जमिनीची धुप रोखण्यास मदत करते तसेच मोठ्या प्रमाणात प्राणवायु सोडते. त्यामुळे ह्या वृक्षांचे संवर्धन करण्याची शिकवण आपणास मिळते.

परंतु आजकाल बायका वडाच्या झाडाची तोडलेली फांदी आणुन त्याची पुजा करतात. परंतु ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. आजकाल नविन बांधकामाच्या नादात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली. त्यामुळे आपण ह्या दिवशी वडाची झाडे लावली पाहिजेतच. त्यांचे संवर्धन केले पहिजे. तरच आजच्या काळात खरी वट पौर्णीमा साजरी होईल.

म्हणुनच आजच्या धावपळीच्या युगात आपण आपल्या सणांचा तर्कशुद्ध विचार करुन नविन पद्धतीचा अवलंब केला तर आपली संस्कृती टिकेल आणि समाजाचा व पर्यावरणाचा समतोल राखण्यासही मदत होईल



# Web Directory

# biz.brahmanmahasangh.co.in

**अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाची वेब डिरेक्टरी: : ब्राह्मण उद्योजकाला वैयक्तीक पातळीवर त्यांची जाहिरात करणे आर्थिक दृष्ट्या न परवडणारे असते. परंतु तितकेच ते महत्वाचेही असते. सदर प्रस्तावित डिरेक्टरीमुळे उत्पादन व त्यांचे ग्राहक यामधे संपर्क तयार करणे त्या उद्योजकास सोपे होणार आहे**

अंदाजे १२५ कोटी जनतेच्या भारतात उद्योजकांची संख्या फारच कमी आहे. अजुनही भारतात शेती किंवा नोकरी करणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. उद्योग किंवा व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण खुपच कमी आहे. हे वाढण्यास भरपुर वाव आहे. देशाच्या नवीन धोरणानुसार उद्योजकेला आवश्यक चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरु आहेत. याचाच एक भाग म्हणुन केंद्रशासनाने "मेक ईन इंडीया" ही चळवळ सुरु केली आहे. सर्व भारतीय तरुणास या चळवळीबद्दल कुतुहल वाटत आहे.

आजच्या व्यवसायीकाच्या मनात थोडी काळजी असते ती त्याच्या मालाच्या किंवा सेवाउत्पादनाच्या विक्री व्यवस्थेची. ही विषेशत: ब्राह्मण परीवारातील व्यवसायीकाची ही काळजी कमी करण्याच्या दृष्टीकोनातुन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने प्रयत्न सुरु केले आहेत. खरंतरं या व्यवसायीकांना प्रचंड मोठ्या प्रमाणावर बाजारपेठ उपलब्ध आहे. परंतु उद्योजकाचे उत्पादन त्यांच्या ग्राहकांपर्यंत पोहोचत नाही. हे पोहोचण्याचा एक भाग म्हणुन महासंघाने ब्राह्मण व्यवसायीकांची एक "वेब डिरेक्टरी" करण्याचे निश्चीत केले आहे.

ब्राह्मण उद्योजकाला वैयक्तीक पातळीवर त्यांची जाहिरात करणे आर्थिक दृष्ट्या न परवडणारे असते. परंतु तितकेच ते महत्वाचेही असते. सदर प्रस्तावित डिरेक्टरीमुळे उत्पादन व त्यांचे ग्राहक यामधे संपर्क तयार करणे त्या उद्योजकास सोपे होणार आहे. तसेच आज राज्यातील ब्राह्मण समाजाची लोकसंख्या विचारात घेता त्यांना त्यांच्या गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या उत्पादनाची वा सेवा उत्पादनाची खरेदी करावीच लागते. अशी एखादी डिरेक्टरी असेल तर हा खरेदीदार ब्राह्मण उद्योजकाकडुन खरेदी करुन त्याच्या गरजा भागवेल अश्या रितीने गरजु विक्रीदार व खरेदीदार यांना एकत्र आणण्याचे काम या डिरेक्टरीमुळे सोपे होणार आहे. यातुन व्यवसायीकांचा व्यवसाय वाढण्यास मदत होणार आहे.

**आज आपण सगळीकडे काही विशीष्ठ समाजातील व्यवसायीकांची संख्या मोठ्या प्रमाणावर पहातो. उदा. जैन, गुजर, मारवाडी, भोरी ई. हे सर्व व्यवसायीक आपापल्या समाजातील व्यवसायीकाची वाढ किंवा भरभराट करण्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या मदत करीत असतात. या समाजाच्या दृष्टीकोनातुन हे अत्यंत महत्वाचे आणि प्रगतीचे पाउल समजले जाते. वरील समाजामधे याबाबत जाणीवपुर्वक प्रयत्न केले जातात. ब्राह्मण समाजात याबद्दल अश्या समाजातील व्यवसायीकांचे तोंड भरुन कौतुक केले जाते. परंतु हे सुत्र अवलंबण्यात आमचे प्रयत्न आजपर्यंत फारच कमी असल्याचे दिसते.**

**अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने यातील नेमकेपणा हेरुन अश्या उद्योजकांची डिरेक्टरी करुन वरील सुत्राचे अनुकरण करण्यात एक पाउल पुढे टाकले आहे. आपण सर्व ब्राह्मण व्यवसायी-कांनी याकडे सकारात्मक दृष्टीने बघुन या अभियानात उतरले पाहिजे**

ही "वेब डेरेक्टरी" महाराष्ट्रातील ब्राह्मण व्यवसायीकांची आवश्यक ती माहिती गोळा करुन त्याचा समावेष डिरेक्टरीमधे करेल. सदर महितीमधे उद्योजकाचे नाव, उद्योगाचा प्रकार, उत्पादनाची सविस्तर महिती, संभाव्य ग्राहक ई. बाबींचा उल्लेख असेल.

**वेब डिरेक्टरी**

ब्राह्मण व्यवसायीकांनी ही माहिती महासंघाकडे पाठविल्यास ती सदर वेब डिरेक्टरीमधे सादर केली जाईल. पहिल्या टप्प्यात राज्यातील सुमारे १००० व्यवसायीकांची माहिती या डिरेक्टरीवर ठेवण्याचे नियोजन आहे. यासाठी नोंदणी सुरु झाली असुन प्रती व्यवसायीकास यासाठी रुपये ५०० पाच वर्षासाठी नोंदणी फी म्हणुन आकारण्यात येईल. तर दुसऱ्या टप्प्यातील (१०००-२५००) व्यवसायीकांसाठी नोंदणी फी ५०० रुपयेच असेल मात्र त्याचा कालावधी चार वर्षाचा असेल. तर तिसऱ्या टप्प्यातील (२५०० पुढील) व्यवसायीकांचा कालावधी तीन वर्षांचा असेल.

# Web Directory

**biz.brahmanmahasangh.co.in**

या नोंदणी मुळे निर्धारीत कालावधींसाठी व्यवसायीकास खालील फायदे होतील.

– या व्यवसायीकाच्या उत्पादनाची संपुर्ण माहिती "वेब डिरेक्टरीवरती" प्रकाशीत करुन ती त्याच्या जिल्ह्यातील, राज्यातील इतर राज्यातील तसेच जगभरातील अपेक्षीत ग्राहकापर्यंत पोहोचविण्यात येईल. सदर माहिती इंग्रजीमधे असेल.

– अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे काम महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामधे सुरु आहे. या अंतर्गत तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय बैठकांचे आयोजन वेळोवेळी करण्यात येते. या बैठकांमधुन या डिरेक्टरीबद्दल सर्वांना परीचित करुन ग्राहकास या व्यवसायीकांकडुन त्यांचे उत्पादन किंवा सेवा उत्पादन घेण्यास प्रवृत्त करण्यात येईल

– अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ ईमेल, एस.एम.एस. या माध्यमातुन व्यवसायीकांच्या संपर्कात राहील व संबंधीत व्यवसायीकाचा व्यवसाय त्याला खरेदीदार मिळवुन देऊन कसा वाढेल यासाठी प्रयत्नशील राहील.

– व्यवसायीकाकडे वेबसईटमार्फत आलेल्या ग्राहकास व्यवसायीकाकडून त्याच्या मालाच्या किंमतीत काही सुट मिळावी ही महासंघाची अपेक्षा आहे. याचा फायदा महासंघाला न होता तो विक्रेता व ग्राहकास निश्चीत होईल. यामुळे ग्राहकास सवलतीत ते उत्पादन मिळेल तर विक्रेत्याचा व्यवसाय वाढुन त्याचा फायदा होईल. महासंघाला ब्राह्मण कुटुंबांना संघाच्या या कार्याने आर्थिक फायदा करुन दिल्याचा आनंद लाभेल. या रुपाने महासंघास समाजातील आपल्या लोकांची सेवा करण्याची संधी मिळेल.

**– सवलतीच्या दरात उत्पादन मिळत असल्याने ग्राहकास तर ग्राहक वाढल्याने उत्पादकास फायदा होईल. आपल्या समाजातील पैसा आपल्या समाजात रहात असल्याने ब्राह्मण महासंघाच्या कार्यातील आर्थीक धोरणास चालना मिळेल.**

– व्यवसायीकास त्याचा व्यवसाय चालवित असताना शासकीय धोरणांमुळे काही अडचणी येतात. या अडचणी तो वैयक्तीक स्तरावर सोडविण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी त्याला बराच वेळ व पैसा मोजावा लागतो. परंतु अश्या अडचणी अनेक व्यवसायीकांस येत असतील तर अशी सामुदायीक समस्या सोडविण्यासाठी ब्राह्मण व्यवसायीकांच्या मागे महासंघ उभा राहील. या बाबतीत ब्राह्मण महासंघ एक प्रकारे दबाव गट (प्रेशर गृप) म्हणुन काम करेल. यातुन या समस्या संबंधीत तालुका व जिल्हास्तरावर न सुटल्यास त्या राज्य वा देश पातळीवर हाताळुन त्या सोडविण्याचा प्रयत्न ब्राह्मण महासंघ करेल.

– ब्राह्मण समाजात तुलनेने शिक्षणाचे प्रमाण चांगले आहे. त्यातही बहुसंख्य समाज संगणक परीचित असल्याने डिरेक्टरीवरील माहितीचा उपयोग जास्तीतजास्त ग्राहकांपर्यंत पोहोचुन व्यवसायीकांचा फायदा होईल. तसेच ग्राहकास मोबाईल ईंटरनेटबाबत माहिती असल्याने तो ह्या डिरेक्टरीबाबत कुठेही बसुन महिती घेऊ शकेल.

– ब्राह्मण महासंघ वेळोवेळी व्यवसायीकांसाठी वेगवेगळ्या कार्यशाळांचे आयोजन करीत असतो. सदर कार्यशाळेसाठी वेबडिरेक्टरीसाठी नोंदणी केलेल्या व्यवसायीकास निमंत्रीत करण्यात येईल. या कार्यशाळेमधुन व्यवसायीकास त्याचा व्यवसाय वृद्धींगत करण्याच्या दृष्टीने विविध तज्ञांचे मार्गदर्शन मिळेल.

– ब्राह्मण महासंघ हा ब्राह्मण समाजातील लोकांच्या समाजीक विकासात काम करीत आहे. ब्राह्मण व्यवसायीकांनी या वेबडिरेक्टरीवर नोंदणी केल्यास यातुन मिळणाऱ्या आर्थिक लाभातुन महासंघाचे कार्य पुढे नेणे महासंघाला आधिक सुकर होणार आहे. महासंघाच्या या कार्यात आपणाकडुन अशाप्रकारे सहकार्य मिळेल.

संपर्क:
अनिरुद्ध जोशी
७३८५८५६३१३
Biz.brahmanmahasangh.co.in

# अनिल कुलकर्णींवर अन्याय : जळगाव येथे निवेदन





अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ व ब्राह्मण सभा, जळगाव तर्फे गळनिंब ता. श्रीरामपुर येथील अनिल कुलकर्णी यांचे घरावर जातीय द्वेषापोटी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी तहसीलदारंच्या मदतीने, पोलीस बळाचा वापर करुन अतिक्रमणाच्या खोट्या आरोपाखाली राहाते घर पाडले. या घटनेने उद्विग्न होऊन अनिल कुलकर्णी यांनी आत्मदहन केले.

या अन्यायकारक घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर कठोर कारवाई करावी. **सदर घटनेची सी. आय. डी. चौकशी करावी. त्यांच्या कुटुंबीयांना १० लाख रु. मदत त्वरीत द्यावी.** अशा आशयाचे निवेदन प्र. जिल्हाधीकारी मा. अंतुलीकर साहेब यांना देण्यात आले.

या प्रसंगी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक जोशी, जळगाव जिल्हाध्यक्ष रविंद्र जोशी, महासचीव शैलेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष विनित जोशी, कार्याध्यक्ष शशिकांत बडोदकर, ब्राह्मण सभेचे चिटणीस आर. आर. वैद्य, संजीव कुलकर्णी गोंदेगावकर, ॲड. प्रशांत महाजन, व्ही. पी. कुलकर्णी, विजयसेठ जोशी, श्रीतेज पाठक, सौ. हेमलता कुलकर्णी, सौ. अमला पाठक, सचीन दुलाखे, ई. समाज बंधु-भगिनी उपस्थित होते.








# अनिल कुलकर्णींवर अन्याय : नाशीक, परभणी, सांगली, मेहकर ई. ठिकाणी निवेदन

**या अन्यायकारक घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर कठोर कारवाई,**
**➤ घटनेची सी. आय. डी. चौकशी,**
**➤ खटला द्रुतगती न्यायालयात चालवावा,**
**➤ त्यांच्या कुटुंबीयांना १० लाख रु. त्वरीत मदत**
**अश्या आशयाची निवेदने विविध जिल्हा व तालुक्यामधे देण्यात आली.**






नाशीक येथे जिल्हाधीकारी राधाकृष्ण बी. यांना निवेदन देताना मिनाक्षी वैद्य, पवन कंठे, कुमार मुंगी, भानुदास शौचे, सतीश शुक्ल, हृषीकेश पाठक, तुषार जोशी आदी उपस्थित होते.





मेहकर येथे निवेदन देताना महासंघाचे निलेश बावणे, जयदीप दलाल, सतिश पळसोकर, दिनकर सदावर्ते, रामदास राजेगावकर, बल्लुजी मोहरील, ॲड. ईंद्रजीत सावजी, हर्षल सोमण, संजय शर्मा, किरण जोशी, शेखर राजे, संदीप तट्टे, रामकृष्ण पाठक, विकास जोशी, प्रदिप जोशी, सचिन जोशी, नरहरी जोशी



**परभणी** येथे महासंघाचे प्रदेश चिटणीस विलास कौसडीकर, जिल्हाध्यक्ष शंकर आजेगावकर व जिल्हा शाखेचे पदाधीकारी कार्यकर्त्यांणी ई. नी जिल्हाधी-काऱ्यांस निवेदन दिले.

**सांगली** येथे मंगेश ठाणेदार, केदार खाडीलकर, मोहिनीराज जतकर आदींनी निवेदन दिले.



## उपनयन संस्कार : बीड




अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे प्रतीवर्षाप्रमाणे याही वर्षी सामुदायीक उपनयन संस्कार करविर निवासिनी महालक्ष्मी मंदीर शिदोड येथे मोठ्या उत्साहामधे संपन्न झाला.

कार्येक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन अनिल जगताप, सुनिल अनभुले, पप्पु बरिदे, आदी मान्यवर उपस्थित होते. वे. शा. सं. नारायण सुलाखे, विनोद रामदासी, सिद्धेश्वर रामदासी यांनी बटुंचे पौरोहित्य केले.

कार्यक्रमास महासंघाचे प्रांत उपाध्यक्ष रविंद्र देशमुख, उपाध्यक्ष राजाभौ शेलमोहकर, समीर पाटोदकर, जिल्हाध्यक्ष चंद्रकांत जोशी, उपाध्यक्ष गजानन जोशी, अमोल जोशी, अनंत पाटील सुहास कुलकर्णी, अमोल आगवान, वालुदेवा कुलकर्णी, अमोल कुलकर्णी, बाळासाहेब खडकीकर, धनंजय औटी, प्रदीप डोंगरे, प्रविण कुलकर्णी, सचिन कुलकर्णी, शहराध्यक्ष नितेश कुलकर्णी, राजु निरगुडे, अनिकेत हरी, संजय खडकीकर, आकाश गोले आर्दीची उपस्थिती होती.

---

### गावागावात महासंघ

कोल्हापुर जिल्ह्यामधील चंदगड तालुक्यामधील कोरज या हजार - दिडहजार लोकसंख्येच्या छोट्या गावात लक्ष्मी यात्रेनिमित्त महासंघाचे सहर्ष स्वागताचे बॅनर लागले होते.



## सावरकर व्याख्यानास अकोल्यातील तमाम जनतेचा ऊत्स्फुर्त प्रतिसाद....






अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ जिल्हा अकोला, युवा आघाडी द्वारा आयोजीत व्याख्यानास अकोल्यातील तमाम जनतेचा ऊत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. मा. ना. डा. रणजीतजी पाटील साहेबांसह (ग्रुहराज्यमंत्री, पालकमंत्री, अकोला) मोठ्यासंख्येने जनसमुदाय ऊपस्थीत होता.

28 मे 2017 रोजी सावरकर जयंतीचे औचित्य साधुन सावरकर... वन्स मोअर! हे व्याख्यान स्व. प्रमिलाताई ओक सभाग्रुह, बस स्थानकासमोर, अकोल येथे आयोजीत केले होते. प्रा. सुमंतजी टेकाडे यांनी सावरकरां विषयी महत्वपुर्ण महिती यावेळी दिली.

कार्यक्रमासाठी अकोला, युवा आघाडी कुशल सेनाड, अनुराग जोशी, समीर देशपांडे, समिर पाठ्क, अजिंक्य देशपांडे, मुक्ता कोरान्ने, स्नेहल मुळे, मधुरा जोशी, अपूर्वा महा, श्रयस गावपाण्डे, सायली देशपांडे, गौरि कुलकर्णी, सम्पदा सोनटक्के, यामिनी महा, मयूर मडदे, चिन्मयी घुटिकर, भक्ति, श्रेया जागीरदार, वरद कुलकर्णी, आशुतोष शुक्ल, कुलकर्णी सर व वादक–श्री शांतनु जहागिरदार, अमीत जोशी, सारंग वझे यांनी परीश्रम घेतले





## सावरकर जयंती



अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, बिड जिल्हाशाखेतर्फे जवाहर कॉलनी मधे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष चंद्रकांत जोशी, शिवसेना जिल्हाध्यक्ष अनिल जगताप, अभिजित बरिदे, राजु सेलमोहकर, समिर पाटोदकर, गजानन जोशी, नितेश अमित पालसिंगणकर, अशिक कडेकर, अमोघ अघवान, प्रशांत कुलकर्णी, ज्ञानेश कुलकर्णी, धनंजय रामदासी, मुकुंद कुलकर्णी, अक्षय भालेराव आदी पदाधीकारी उपस्थित होते.



औरंगाबाद येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरक. रांना अभिवादन करताना अनिल मुळे, औरंगाबाद येथील पदाधीकारी



पुणे येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरक. रांना पुष्पहार घालताना जिल्हाध्यक्ष आनंददवे, हृषीकेश सुमंत, जोशी व पदाधीकारी

## सावरकर जयंती

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ पिंपरी चिंचवड वतीने वि. दा. सावरकर व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर संयुक्त जयंती कार्यक्रम झाला.






## महासंघाच्या मागणीस यश
## स्वा. सावरकर जयंतीलाच त्यांचे तैलचित्र पालीकेत बसविणार

पिंपरी चिंचवड महापालीकेच्या सभागृहात स्वातंत्रवीर सावरकरंचे तैल चित्र बसविण्याचा निर्णय सर्वसाधारण सभेने घेतला आहे. दि. 28 मे रोजी सावरकरांच्या जयंती दिवशी तैलचित्र पालिका सभागृहात बसविण्यात येणार असल्याचे महापौर नितिन काळजे यांनी सांगीतले.



अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या शिष्टमंडळाने स्वातंत्रवीर सावरकरांच्या जयंती दिवशीच पालीका सभागृहात बसविण्याची महापौरांकडे मागणी केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमहापौर शैलजा मोरे, सत्तारुढ पक्ष नेते एकनाथ पवार आदी उपस्थित होते.

महासंघाच्या शिष्टमंडळात महासंघाचे पिंपरी चिंचवड अध्यक्ष दिलिप कुलकर्णी, उपाध्यक्ष पुष्कराज गोवर्धन, राजन बुडुख, सुहास फोफळे, संघटन सरचिटणीस सुनील देशपांडे, कार्यालयीन सरचिटणीस महेश बारसावडे, खजीनदार मुकुंद कुलकर्णी, पियुष आवटी, दिलीप गोसावी, उज्वला केळकर, अविनाश नाईक, महिला आघाडी अध्यक्षा माधुरी ओक, संदीप बेलसरे, गोपाळ कळमकर, उपेंद्र पाठक, अनंत कुलकर्णी, अशोक पारखी, महेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

स्वातंत्रवीर सावरकरांचे तैल चित्र पालीका सभागृहात बसविण्याच्या घेतलेल्या निर्णयाबद्दल महासंघाने महापौरांसह, विरोधी पक्ष नेते, गटनेत्यांचे आभार मानले.

सावरकरांचे तैलचित्र 28 मे रोजीच पालीका सभागृहात बसविण्यात येणार आहे. सावरकरांचे तैलचित्र तयार आहे. पुण्याचे पालकमंत्री गिरीष बापट आणि शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत 28 मे रोजी दुपारी एक वाजता तैलचित्राचे अनावरण करण्यात येणार असुन हे तैल चित्र पालीका सभागृहात बसविण्यात असल्याचे, महापौर काळजे यांनी सांगीतले.



## ब्रह्मोद्योग – जालना




दिनांक 21:05:2017 रविवार रोजी ब्रह्मोद्योग जालना येथील ब्राह्मण व्यवसायिकांची तिसरी मिटींग हॉटेल अमित जालना येथे 45 सदस्यांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात संपन्न झाली. मीटिंग सुरुवातीस बाबासाहेब दंडारे यांनी ब्रह्मोद्योग व्हिजन-मिशन बद्दल माहिती दिली. उपस्थित व्यवसायिकांनी आपापला परिचय दिला.

या बैठकीत प्रसिध्द मोटीवेशनल स्पिकर किसनजी वतनी यांनी अतिशय उपयुक्त अशी माहिती उपस्थितांना दिली.

त्यांच्या व्याख्यानाने उपस्थित व्यवसायिक बंधू उत्साहीत झाले होते.

सतीश मंडपे यांनी ब्रह्मोद्योग बद्दल माहिती दिली.

अनिल मुळे यांनी आक्रमक शैलीत महासंघ ची भूमिका व त्याचा व्यवसायिकांना कसा लाभ होतो हे सांगितले




सतीश मंडपे (प्रदेशाध्यक्ष, ब्रह्मोद्योग) यांचे स्वागत करताना पदाधीकारी

जालना येथे ब्रह्मोद्योग मिर्टिंगमधील व्यवसायीक



## ब्रह्मोद्योग – औरंगाबाद




दिनांक 28:05:2017 रविवार रोजी ब्रह्मोद्योग, औरंगाबाद येथील 16वी ब्राह्मण व्यवसायिकांची मीटिंग हॉटेल सिल्वर इन, जालना रोड, येथे 47 उपस्थितीत अतीशय उत्साहात सम्पन्न झाली. मीटिंग ची सुरुवात श्री जगदीश एरंडे यांनी ब्रह्मोद्योग बद्दल तर श्री सतीश मंडपे यानी ब्रह्मोद्योग व्हिजन-मिशन बद्दल माहिती दिली.

सर्व सदस्यांनी आपली ओळख करुन देताना ब्रह्मोद्योग द्वारे किती चांगला बिझनेस मिळाला हे आवर्जून नमूद केले. युवा उद्योजक अक्षय कुलकर्णी यांनी ब्रह्मोद्योग मुळे व्यवसायिक सुरुवात अतिशय यशस्वी पणे झाली हे प्रकर्षाने नमूद केले

आज चे विशेष अतिथि श्री कृष्णा कुर्दुकर यांचा श्री श्रीकांत गोसावी व वेदांत जागीरदार यांनी भगवान परशुराम प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर श्री कृष्णा कुरुड्कर यांनी आपल्या संकेतस्थळाचे प्रेजेंटेशन करून विस्त्रुत माहिती उपस्थित सभासदाना दिली.

दामिणि दुबे यांनी यशस्वी उद्योजकाच्या सक्सेस स्टोरी मुळे आपल्या विचारात आमूलाग्र बदल घडतो, त्या साठी मासिकाचे सभासद होण्याचे आवाहन केले. श्री गोसावी यांनी आज पर्यंत रुपये 1,61,40,353 व्यवासाय झाला ही माहिती दिली.







**ब्रह्मोद्योग, औरंगाबाद**


समस्त ब्राह्मण व्यवसायीकांची दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी मिटिंग होते नवीन सभासदांसाठी संपर्क : जगदीश एरंडे 8308076999 : 02406546999 वेदान्त रत्नपारखी : 9822611531



## दिनविशेष



5 जुन
जागतीक पर्यावरण दिन




12 जुन
पु. ल. देशपांडे पुण्यतिथी
8 नोव्हेंबर 1919 - 12 जुन



25 जुन
दामोदर चाफेकर जयंती
25 जुन 1869 - 18 एप्रिल



6 जुन
छ. संभाजी महाराज जयंती
जेष्ठ शुद्ध द्वादशी



17 जुन
गोपाळ गणेश आगरकर पुण्यतिथी
14 जुलै 1856 - 17 जुन



26 जुन
बाल गंधर्व (नारायण श्रीपाद राजहंस)
26 जुन 1888 - 15 जुलै




8 जुन
वटपौर्णिमा
जेष्ठ शुद्ध पौर्णिमा



18 जुन
झाशीची महाराणी लक्ष्मीबाई
पुण्यतिथी



10 जुन
जागतीक दृष्टीदान दिन



21 जुन
जागतीक योग दिवस



11 जुन
रामप्रसाद बिस्मील जयंती
11 जुन 1897 - 19 डिसेंबर



23 जुन
नानासाहेब पेशवे पुण्यतिथी
16 डिसेंबर 1721 - 23 जुन


आरजू
मल्टीॲक्टिव्हिटी सेंटर आणि
कोचिंग क्लासेस

1 to 4 std ICSE &
CBSE Board

1 to 8 SSc Board
All subjects

Yoga Chess Drawing

Calligraphy
Zumba
Cake Making

यांचे वर्ग तज्ञ व अनुभवी
शिक्षक, मुलांकडे विशेष लक्ष

9823147225
Dhankawadi, Pune

पुणे विद्यापिठाचे कुलगुरु करमळेकर यांची सदिच्छा भेट. पुष्पगुच्छ देताना महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गोविंदजी कुलकर्णी





केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचा सन्मान करीतान महासंघाचे प्रदेश पदाधीकारी अभयजी खेडकर

ब्रह्मकेसरी मासिकाच्या मे महिन्याच्या अंकाचे प्रकाशन करीतान महासंघाचे केंद्रीय मंत्री शामराव जोशी

